!! श्री !!


# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते


जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शेंद्रा-बिडकीन स्मार्ट सिटी बरोबर संभाजीनगरचा समावेश करा : शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

## केंद्रिय शहर विकास सचिव मधुसुदन प्रसाद व स्मार्टसाठी प्रकल्प सचिव समीर शर्मा यांची भेट घेऊन दिले निवेदन

**संभाजीनगर : ( ता.१८ )** संभाजीनगर शहर औद्योगिकदृष्ट्या प्रगतीपथावर असुन समांतर जलवाहिनी, भुमिगत गटार योजना, डि. एम. आय. सी. प्रकल्प यासारखे महत्वाचे प्रकल्प झाले असुन याच बरोबर शहराचा स्मार्ट सिटी प्रकल्पात समावेश करा. केंद्रिय शहर विकास मंत्रालयाला यापुर्वी आपण निवेदन देऊन मागणी केली आहे. परंतु राज्य शासनाचा प्रस्ताव पाठविल्यास या योजनेत संभाजीनगरचा समावेश लवकर होईल. या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद लवकरच संबंधीच्या प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले.

केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असुन राज्य मंत्रिमंडळाचा प्रस्ताव पाठल्यास लवकरच समावेश होऊ शकतो. संभाजीनगर ला सर्व समावेशक गोष्टी प्रकल्पासाठी मुबलक जागा, पाणी, वातावरण, मनुष्यबळ, आर्थिक, सामाजिक, औद्योगिक क्षेत्राला दर्जाचे स्थान यामुळे संभाजीनगर सर्वांत वेगाने वाढणारे शहर आहे.

या सर्वच गोष्टीचा विचार करुन मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाला या प्रस्तावाला केंद्राकडे त्वरीत पाठवण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ / मनोज वडगावकर**


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com  
8421415255/9420404329

ganeshwagh4400@gmail.com  
8484066606/9604384400